# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.२५२/२०२२

**विषय :** पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची आभासी प्रणालीद्वारे (Online) घेण्यात येणारी मौखिक परिक्षा (Viva-voce) यापुढे आभासी प्रणालीद्वारे (Online)/ प्रत्यक्ष स्वरूपात (Offline) पध्दतीने सुरू ठेवण्याबाबत.

कोविड—१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठांनी पीएच्.डी/एम्.फिल. अभ्यासक्रमांची मौखिक परीक्षा आभासी प्रणालीद्वारे (Online) पद्धतीने Video Conferencing द्वारे Google, Skype, Microsoft Technologies इ. तंत्रज्ञानाच्या मदतीने आयोजित करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केली होती. त्यास अनुसरून सदर पीएच्.डी/एम्.फिल. ची मौखिक परीक्षा आभासी प्रणालीद्वारे (Online) पध्दतीने घेण्यात येत आहे.

सध्या विविध अभ्यासक्रमाचे वर्ग/परीक्षा हे ऑफलाईन/ऑनलाईन या दोन्ही माध्यमातून विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र. 14-8/2020(CPP-II) दिनांक ११/०२/२०२२ नुसार आयोजित करण्यात येत आहेत. वरील पार्श्वभूमीवर पीएच्.डी/एम्.फिल. अभ्यासक्रमांची मौखिक परीक्षा ही ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने Video Conferencing द्वारे Google, Skype, Microsoft Technologies इ. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्व संबंधितांना सोयीस्कर तंत्रज्ञानासह मौखिक परीक्षा आयोजित करण्याबाबत विद्यापीठाने विचार करावा असे कळविण्यात आले आहे.

सदरचा प्रस्ताव हा दिनांक २३/०७/२०२२ रोजीच्या मा.विद्यापरिषदेच्या बैठकित विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

ठराव

वि.प.क्र.अ १६पीए/१६/२०२२ दि.२३ जुलै, २०२२

**असा ठराव करण्यात येतो की, पीएच्.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची ऑनलाईन (Online) पध्दतीने घेण्यात येणारी मौखिक परिक्षा (Viva-voce) यापुढे आभासी प्रणालीद्वारे (Online) किंवा प्रत्यक्ष स्वरूपात (Offline) पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**परंतु प्रत्यक्ष (Offline) किंवा आभासी (Online) पध्दतीने मौखिक परिक्षा (Viva-voce) आयोजित करण्याबाबतचा निर्णय संबंधित मार्गदर्शक आणि संशोधन केंद्राचे प्रमुख यांनी घ्यावा. जर मार्गदर्शक आणि संशोधन केंद्रप्रमुख यांचे याबाबत एकमत न झाल्यास संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठाता यांनी निर्णय घ्यावा.**

सबब, मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संशोधन संस्था तसेच मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे झालेल्या ठरावानुसार आपल्या संशोधन केंद्रातील पीएच्.डी/एम्.फिल. अभ्यासक्रमांची मौखिक परीक्षा आयोजित करण्यासंबंधी सर्व संबंधित संशोधन मार्गदर्शकांना योग्य ती कार्यवाही करण्यासंबंधी सूचित करण्यात यावे.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. शै.प्रवेश/४३९३
दिनांक : १२/०९/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा. संचालक, विद्यापीठ सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

E:\PGSECTION\CIRCULAR 2022.DOCX